0 8 JAN 2026
तरूण भारत

# विद्यापीठ १७ अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील बुधवारी १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले असून आजअखेर ४४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. मंगळवारी विविध ५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १५ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ६४५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 JAN 2026

"सकाळ"

# ज्ञानक्षेत्रात काम करणाऱ्यांनी स्वामित्व हक्क मिळवावा

## डॉ. गजानन राशिनकर : ‘स्वामित्व हक्क : काही नव्या दिशा’वर व्याख्यान

कोल्हापूर, ता. ७ : ‘बौद्धिक हक्क संपादन करणे ही काळाची गरज आहे. आवश्यक बाबींची पूर्तता पूर्ण करून, ज्ञानक्षेत्रात काम करणाऱ्यांनी स्वामित्व हक्क प्राप्त करावा’, असे आवाहन डॉ. गजानन राशिनकर यांनी केले. विद्यापीठातील मराठी विभागाच्या ‘स्वामित्व हक्क : काही नव्या दिशा’ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. राशिनकर म्हणाले, ‘कोणतीही सर्जनशीलता नावीन्यपूर्णरीत्या प्रत्यक्ष अवतरते, तेव्हा त्या कर्त्याला स्वामित्व हक्क प्राप्त होतो. यासाठी वयाची अट नाही. एआयच्या जमान्यात हक्काची बाब म्हणून गांभीर्याने पाहावे.’

डॉ. पवार म्हणाले, ‘कल्पनांना स्वामित्व हक्क नाहीत; पण आजचा तुमचा विचार उद्या नव्या जगात घेऊन जाणारा ठरणार आहे. त्यामुळे आपल्या ज्ञानाची काळजी म्हणून याकडे पाहणे गरजेचे आहे.’ यावेळी प्रा. नंदकुमार मोरे यांच्या ‘असे होते आपले शाहू महाराज’ या पुस्तकाला स्वामित्व हक्क मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. सुखदेव एकल, विमल मोरे, डॉ. कोळेकर आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ज्योती वराळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JAN 2026
पुण्यनगरी

# भारतीय शिक्षणाचे जागतिकीकरण करणे महत्त्वाचे : डॉ. सहस्त्रबुद्धे

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

देशात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवत असताना समाज, परिवार, माध्यमे, तंत्रज्ञान, ज्ञान व परंपरा यांचे आव्हान आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये संशोधन नीती महत्त्वाची असून, भारतीय शिक्षणाचे व ज्ञानपरंपरेचे जागतिकीकरण करणे महत्त्वाचे आहे, असे मत भारत सरकारच्या इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष व माजी खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले.



**गडहिंग्लज : दीपप्रज्वलनाने राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. विनय सहस्त्रबुद्धे. उपस्थित सतीश घाळी, ज्योती जाधव यांच्यासह मान्यवर.**

विद्यापीठ विकास मंच, शिवाजी विद्यापीठ आणि विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने येथील डॉ. घाळी कॉलेजमध्ये 'एन.ई.पी २०२० : अ न्यू ईरा इन इंडियन एज्युकेशन इम्प्लिमेशन फॉर टीचर्स, स्टुडन्स अँड सोसायटी' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभावेळी ते बोलत होते.

प्राचार्य दत्ता पाटील यांनी स्वागत केले. डॉ. सहस्त्रबुद्धे पुढे म्हणाले, भारत हा विश्वमित्र आहे, याची जाणीव जगाला करून देणे हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ असल्याचे सांगून भारतीय संस्कृती व ज्ञान परंपरा जपण्याची गरज असल्याचे सांगितले.

लेफ्ट. अश्विन गोडघाटे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. डॉ. श्रीकांत पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी प्राध्यापकांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित शोध पेपरचे सादरीकरण केले. परीक्षक म्हणून आर. ए. घोरपडे, एम. आर. ठोंबरे यांनी काम पाहिले.

यावेळी विद्यापीठ विकास मंचचे डॉ. परमेश्वर हसबे, डॉ. सतीश घाळी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. नितीन करमळकर, मकरंद चितळे, डॉ. प्रशांत साठे, विजयराव जोशी, ॲड. स्वागत परुळेकर, डॉ. अनिल राव, प्राचार्य एच. व्ही. देशपांडे, एन. बी. गायकवाड, संजय परमाने, अर्चनाताई कोळेकर, ॲड. बी. जी. भोसकी, गजेंद्र बंदी, ॲड. विकास पाटील, किशोर हंजी, यांच्यासह विविध राज्यांतून व महाविद्यालयांतून आलेले प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. नाझिया बोजगर व प्रा. श्रुती बेल्लद यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मिलिंद पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

0 8 JAN 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजीटल शिक्षणातून राष्ट्रीय शैक्षणिक प्रगती

## डॉ. एम. एस. देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर



डिजिटल शिक्षण आणि ई–कन्टेन्टच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक प्रगतीचा वेग अधिक गतिमान होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सामाजिक शास्त्रांच्या अध्यापन व अध्ययनासाठी ई–कन्टेन्ट" या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, तसेच विविध विद्याशाखांतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. देशमुख म्हणाले, आजच्या जागतिक संदर्भात शिक्षणाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचे प्रभावी साधन म्हणजे ई–कन्टेन्ट आहे. सामाजिक शास्त्रांमध्ये विविध विषयांचा समावेश असल्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण आणि समकालीन ज्ञान पोहोचविण्यासाठी ई–कन्टेन्ट अत्यंत उपयुक्त ठरते. प्रा. डॉ. सागर डेळेकर यांनी डिजिटल शिक्षण हे आज प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालले असल्याचे नमूद केले.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी भविष्यात शिक्षण क्षेत्रात ई–कन्टेन्टचे महत्त्व अधिक वाढणार असल्याने त्यासंबंधी आवश्यक कौशल्ये, ज्ञान वृत्ती शिक्षकांनी आत्मसात करणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

अहिल्यानगर येथील नॉलेज ब्रिज फाउंडेशनचे प्रशिक्षक भूषण कुलकर्णी यांनी तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे एक शिक्षक एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे दर्जेदार ई–कन्टेन्ट निर्मिती आजच्या शिक्षण व्यवस्थेची गरज बनली आहे. भविष्यात हायब्रीड शिक्षण पद्धतीला विशेष महत्त्व प्राप्त होणार असल्याचे नमुद केले. स्वागत डॉ. नितीन रणदिवे, पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी, तर आभार प्रदर्शन डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

08 JAN 2026
पुढारी

# वंचितांच्या जगण्याचा इतिहास सामोरा यावा : प्रा. ज्ञानेंद्र पांडेय

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

वंचित, उपेक्षितांच्या जगण्याचा व अनुभवाचा इतिहास लिहिणे अत्यंत कठीण असते, पण तोच खरा दुर्लक्षित इतिहास आहे. तो सामोरे आणण्याचे काम नव्या पिढीतील इतिहास अभ्यासक, संशोधकांना करावे आहे, असे प्रतिपादन अटलांटा (अमेरिका) येथील एमोरी विद्यापीठाचे इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी आणि विदेशी भाषा अधिविभागांच्या संयुक्त विद्यमाने 'दुर्लक्षित इतिहासः लपलेल्या इतिहासाची पुनर्प्राप्ती' या विषयावर आयोजित विशेष शैक्षणिक व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते. डॉ. माया पंडित प्रमुख उपस्थित होत्या.

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर क्रांतीची प्रक्रिया सतत कार्यरत असल्याचे सांगून प्रा. पांडेय म्हणाले, समाज, राजकारण, संस्कृती आणि विचारप्रवाह यांमध्ये होणारे बदल हे क्रांतीचेच

## • विशेष शैक्षणिक व्याख्यान

स्वरूप आहे. आजच्या काळातील डिजिटल क्रांतीने इतिहास लेखन व संशोधनाच्या पद्धतींमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. इतिहासामध्ये केवळ काही निवडक नेत्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग, स्त्रिया यांच्यासह विविध सामाजिक घटकांचा सक्रिय सहभाग असतो. इतिहास लेखनात या घटकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिल्याने इतिहासाचा समग्र आशय समोर येत नाही. भविष्यातील इतिहास मात्र केवळ मोठ्या लढायांचा किंवा नेत्यांचा नसावा. तो इतिहास अशा सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित योगदानकर्त्यांचा असावा आणि तो त्याच्या नजरेतून, अनुभवातून लिहिला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. शरद नावरे, डॉ. शरद भुथाडिया उपस्थित होते.

08 JAN 2026
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन महोत्सवांतर्गत शाहिरी बाणा सादर करताना विद्यार्थी.

# शाहिरीने दुमदुमला विद्यापीठ परिसर

- शिवस्पंदन महोत्सवांतर्गत नकला, लघुनाटिकांचे बहारदार सादरीकरण

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवांतर्गत बुधवारी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शाहिरी बाण्याने शिवाजी विद्यापीठाचा परिसर दुमदुमला.

मूकनाट्य, नकला, लघुनाटिका, पारंपरिक वाद्य वादनासह पोवाडा, भारूड, शिवगीते यांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाहीर पृथ्वीराज माळी आणि परिवार यांनी शाहिरी बाणा सादर केला. दुसऱ्या दिवशीही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमास विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव, डॉ.रघुनाथ धमकेल, डॉ. तानाजी चौगुले, डॉ.विनोद ठाकुर देसाई, डॉ. प्रल्हाद माने, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, सुरेखा अडके यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आज शेवटचा दिवस

शिवस्पंदन महोत्सवाची आज सांगता होणार आहे. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहात एकल नृत्य, समुह नृत्य आणि बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

08 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज अँण्ड व्ह्यूज




# डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कन्टेन्ट अपरिहार्य : अभिजित रेडेकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कन्टेन्ट अपरिहार्य असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी सेल () यांच्या संयुक्त विद्यमाने पी.एम.-उषा अंतर्गत''डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कन्टेन्ट फॉर ऑनलाईन अँड मूक्स'' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी बहुविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता प्रा.डॉ.अजय साळी होते.

श्री. रेडेकर पुढे म्हणाले की, ई-कन्टेन्ट विकासाचे कौशल्य प्रत्येक शिक्षक व विद्यार्थ्याने आत्मसात करणे अत्यावश्यक आहे. आजच्या काळात तंत्रज्ञान साक्षरता ही मूलभूत गरज बनली असून, स्वयं व महा-स्वयं या प्लॅटफॉर्मवर सक्रिय सहभाग घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. डिजिटल शिक्षणामुळे पारंपरिक शिक्षणाच्या संकल्पनांमध्ये मोठा बदल घडून येत असून, या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थी-केंद्रित ई-कन्टेन्ट




निर्मिती ही काळाची गरज बनली आहे,

अध्यक्षीय भाषणात डॉ. साळी म्हणाले की, भविष्यात शिक्षण घेण्यासाठी केवळ वर्गखोलीची आवश्यकता उरणार नाही, अशी मानसिकता निर्माण होत आहे. बदलती पिढी डिजिटल शिक्षणाकडे वेगाने वळत असून, त्यासाठी प्रभावी, परिणामकारक आणि गुणवत्तापूर्ण ई-कन्टेन्ट तयार करणे अत्यंत आवश्यक आहे.

पहिल्या सत्रात अहिल्यानगर येथील नॉलेज ब्रीज फाउंडेशनचे प्रशिक्षक श्री. भूषण कुलकर्णी म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला पाहिजे. डिजिटल साधने समजून घेणे व ती कुशलतेने हाताळणे ही आजची शैक्षणिक गरज आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व भूमिका डॉ. नितीन रणदिवे यांनी मांडली. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी, तर आभार प्रदर्शन संदीप थिटे यांनी केले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, प्रा. डॉ. नितीन माळी, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सुर्यकांत गायकवाड, डॉ. राम चट्टे, प्रा. कांचन खराडे, डॉ. प्रमोद कोळी, डॉ. किशोर खिल्लारे, डॉ. करीम मुल्ला, डॉ. रोहिणी भोसले तसेच मोठ्या संख्येने शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmal Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# गजेंद्र प्रतिष्ठानकडून विद्यापीठास आबा देशपांडे यांच्या स्मरणार्थ देणगी

**कोल्हापूर, (महा न्यूज अ‍ॅण्ड व्ह्यूज) :**

येथील गजेंद्र प्रतिष्ठानकडून प्रसिद्ध उद्योजक कै. अरविंद गजानन तथा आबा देशपांडे यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी शिवाजी विद्यापीठास देण्यात आली.

देशपांडे यांच्या भगिनी तथा मांजरी (पुणे) येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमधील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्नेहल श्रीकांत जोशी (पूर्वाश्रमीच्या रेखा देशपांडे) यांनी हा धनादेश प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला.




डॉ. जोशी या शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. आबा देशपांडे यांच्या पर्यावरण प्रेमास अनुसरून त्यांनी त्यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी विद्यापीठास दिली. या देणगीच्या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून वनस्पतीशास्त्र अधिविभागातील पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी प्रसिद्ध केलेल्या उत्कृष्ट संशोधन लेखास 'बेस्ट रिसर्च पेपर' पारितोषिक देण्यात यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सदर पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्याने विभागाच्या लीड बॉटेनिकल गार्डनमध्ये किमान एक रोप लावून त्याचे संवर्धन करणे बंधनकारक असेल, अशी महत्त्वाची अटही त्यांनी घातलेली आहे.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांच्यासह अधिविभागातील शिक्षक, संशोधक उपस्थित होते.

08 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. लवटे, ॲड. जायभावे यांना मानवतावादी जीवनगौरव पुरस्कार जाहीर

जनप्रवास : कोल्हापूर

मानवतावादी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रा अँड गोव्याचे माजी चेअरमन ॲड. जयंत जायभावे यांना मानवतावादी जीवन गौरव पुरस्कार जाहीर केला आहे. २५ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता मुस्लिम बोर्डिंग हॉलमध्ये पुरस्कार वितरण होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक ॲड. डॉ. रमेश विवेकी अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती पत्रकार परिषदेत मानवतावादी सांस्कृतिक चळवळीच्या प्रमुख अंतिमा कोल्हापूरकर यांनी दिली.

कोल्हापूरकर म्हणाल्या, संमेलनास देशभरातून दोन हजारहून अधिक कवी, लेखक, साहित्यिक, समीक्षक, कलावंत उपस्थित राहणार आहेत. डॉ. सुनीलकुमार लवटे हे ज्येष्ठ साहित्यिक, आहेत. ॲड. जयंत जायभावे हे ज्येष्ठ विधीज्ञ असून भारतीय संविधानाचे अभ्यासक व विश्लेषणकार म्हणून त्यांना ओळखले जाते.




सुनीलकुमार लवटे जयंत जायभावे

08 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितांच्या जगण्याचा इतिहास सामोरा यावा : प्रा. पांडेय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वंचित, उपेक्षितांच्या जगण्याचा आणि अनुभवाचा इतिहास लिहिणे अत्यंत कठीण असते; पण तोच खरा दुर्लक्षित इतिहास आहे. तो सामोरा आणण्याचे काम नव्या पिढीतील इतिहास अभ्यासक, संशोधकांना करावयाचे आहे, असे प्रतिपादन अटलांटा (अमेरिका) येथील एमोरी विद्यापीठाचे प्रख्यात इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी आणि विदेशी भाषा अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने 'दुर्लक्षित इतिहास : लपलेल्या इतिहासाची पुनर्प्राप्ती' या विषयावर आयोजित विशेष शैक्षणिक व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून



**इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय.**

बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते, तर डॉ. माया पंडित प्रमुख उपस्थित होत्या.

इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर क्रांतीची प्रक्रिया सतत कार्यरत असल्याचे सांगून प्रा. पांडेय म्हणाले, समाज, राजकारण, संस्कृती आणि विचारप्रवाह यांमध्ये होणारे बदल हे क्रांतीचेच स्वरूप असून, आजच्या काळातील डिजिटल क्रांतीने इतिहास लेखन व संशोधनाच्या पद्धतींमध्ये आमलाग्र बदल घडवून आणले आहेत. इतिहासामध्ये केवळ काही निवडक नेत्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग, स्त्रिया यांच्यासह विविध सामाजिक घटकांचाही सक्रिय सहभाग असतो. इतिहास लेखनात या घटकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिल्याने इतिहासाचा समग्र आशय समोर येत नाही. भविष्यातील इतिहास मात्र केवळ मोठ्या लढायांचा किंवा नेत्यांचा नसावा. तो इतिहास अशा सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित योगदानकर्त्यांचा असावा आणि तो त्यांच्या नजरेतून, अनुभवातून लिहिला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

स्त्रिया आणि कृष्णवर्णीय समाजाचा इतिहास मोठ्या प्रमाणावर अनार्काइव्हड म्हणजेच अलिखित व दडपलेला राहिला असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. या समाजघटकांचे अनुभव, स्मृती व संघर्ष इतिहासाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही आजच्या इतिहासकारांची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. शरद नावरे, डॉ. शरद भुताडिया आदी उपस्थित होते.

0 8 JAN 2026 जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितांच्या जगण्याचा इतिहास सामोरा यावा

## अटलांटा-अमेरिका येथील एमोरी विद्यापीठाचे इतिहासतज्ज्ञ प्रा. पांडेय यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अमेरिकेतील एमोरी विद्यापीठाचे प्रा. ज्ञानेंद्र पांडेय. सोबत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अवनीश पाटील.

**जनप्रवास** : कोल्हापूर

वंचित, उपेक्षितांच्या जगण्याचा आणि अनुभवाचा इतिहास लिहिणे अत्यंत कठीण असते, पण तोच खरा दुर्लक्षित इतिहास आहे. तो सामोरा आणण्याचे काम नव्या पिढीतील इतिहास अभ्यासक, संशोधकांना करावयाचे आहे, असे प्रतिपादन अटलांटा (अमेरिका) येथील एमोरी विद्यापीठाचे इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी आणि विदेशी भाषा अधिविभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'दुर्लक्षित इतिहासः लपलेल्या इतिहासाची पुनर्प्राप्ती' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.

प्रा. ज्ञानेंद्र पांडेय म्हणाले, समाज, राजकारण, संस्कृती आणि विचारप्रवाह यांमध्ये होणारे बदल हे क्रांतीचेच स्वरूप असून आजच्या काळातील डिजिटल क्रांतीने इतिहास लेखन व संशोधनाच्या पद्धतींमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. इतिहासामध्ये केवळ काही निवडक नेत्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग, स्त्रिया यांच्यासह विविध सामाजिक घटकांचाही सक्रिय सहभाग असतो. इतिहास लेखनात या घटकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिल्याने इतिहासाचा समग्र आशय समोर येत नाही. भविष्यातील इतिहास मात्र केवळ मोठ्या लढायांचा किंवा नेत्यांचा नसावा. तो इतिहास अशा सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित योगदानकर्त्यांचा असावा आणि तो त्यांच्या नजरेतून, अनुभवातून लिहीला जावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. माया पंडित, डॉ. गोपाळ गुरू, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. शरद नावरे, डॉ. शरद भुथाडिया आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 JAN 2026 सकाळ

# शिवस्पंदन महोत्सवात रंगला 'शाहिरी बाणा'

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आज शाहिरी बाणा कार्यक्रम रंगला. उद्या गुरुवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये एकल नृत्य, समूह नृत्याच्या स्पर्धा झाल्यानंतर महोत्सवातील बक्षीस वितरण होणार आहे.

महोत्सवाची सुरुवात सकाळी मूकनाट्याने झाली. त्यानंतर नकला, लघुनाटिका झाल्या. त्यात विविध अधिविभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत सादरीकरण केले. राजर्षी शाहू सभागृहात 'शाहिरी बाणा' कार्यक्रम रंगला. त्यात शाहीर पृथ्वीराज माळी आणि परिवाराने पारंपरिक वाद्य वादनासह पोवाडा, भारूड, शिवगीते यांचे बहारदार सादरीकरण केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, रघुनाथ ढमकले, तानाजी चौगुले, विनोद ठाकुरदेसाई, प्रल्हाद माने, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, सुरेखा अडके आदी उपस्थित होते.

0 8 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत शाहिरी बाणा कार्यक्रम

**कोल्हापूर,(महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव (२०२५-२०२६) अंतर्गत आज कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी मुकनाटय, नकला, लघुनाटिका आणि शाहिरी बाणा यांचे सादरीकरण राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले.

शाहीर पृथ्वीराज माळी आणि परिवार यांच्या शाहिरी बाणा ह्या कार्यक्रमांतर्गत पारंपारिक वाद्य वादनासह पोवाडा, भारूड, शिवगीते यांचे बहारदार सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव, डॉ.रघुनाथ धमकेल, डॉ.तानाजी चौगुले, डॉ.विनोद ठाकुरदेसाई, डॉ.प्रल्हाद माने, उपकुलसचिव



डॉ. वैभव ढेरे, श्रीमती सुरेखा अडके यांचेसह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

उद्या, कार्यक्रमाच्या तीसऱ्या दिवशी, राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशिय सभागृहामध्ये एकल नृत्य, समुह नृत्य आणि बक्षीस वितरण समारंभ संपन्न होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 JAN 2026 तरुण भारत

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संशोधन नीती महत्त्वाची

## डॉ. विनय सहस्त्रबुध्दे यांचे प्रतिपादन : डॉ. घाळी कॉलेजमध्ये राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन



गडहिंग्लज : दीपप्रज्वलन करताना डॉ. विनय सहस्त्रबुद्धे. शेजारी प्र. कुलगुरू ज्योती जाधव, डॉ. सतिश घाळी व इतर मान्यवर.

प्रतिनिधी
गडहिंग्लज

देशात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवत असताना समाज, परिवार, माध्यमे, तंत्रज्ञान, ज्ञान व परंपरा यांचे आव्हान आहे. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये संशोधन नीती महत्त्वाची आहे. भारतीय शिक्षणाचे व ज्ञानपरंपरेचे जागतिकीकरण करणे ही महत्त्वाचे आहे. भारत हा विश्वमित्र आहे याची जाणीव जगाला करून देणे हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दीष्ट आहे, असे मत माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ विकास मंच, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लज यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. घाळी कॉलेजमध्ये 'अ न्यू ईरा इन इंडियन एज्युकेशन इम्प्लीमेशन फॉर टिचर्स, स्टुडन्स ॲन्ड सोसायटी' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतिश घाळी होते.

सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. स्वागत प्राचार्य दत्ता पाटील यांनी केले. समन्वयक लेफ्ट. अश्विन गोडघाटे यांनी कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला.

डॉ. श्रीकांत पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, यावेळी डॉ. परमेश्वर हसबे यानीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. नितीन करमळकर, मकरंद चितळे, डॉ. प्रशांत साठे, विजयराव जोशी, सिनेट सदस्य ॲड. स्वागत परुळेकर, डॉ. अनिल राव, डॉ. एच. व्ही. देशपांडे, डॉ. एन. बी. गायकवाड, संजय परमाने, सिनेट सदस्य अर्चनाताई कोळेकर, संस्थेचे सचिव ॲड. बी. जी. भोसकी, गजेंद्र बंदी, ॲड. विकास पाटील, किशोर हंजी, डॉ. नागेश मासाळ यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यशाळेत शोध पेपरचे सादरीकरण केले. परीक्षक म्हणून डॉ. आर. ए. घोरपडे, डॉ. एम. आर. ठोंबरे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन नाझिया बोजगर, श्रुती बेल्लद यांनी तर डॉ. मिलिंद पाटील यांनी आभार मानले.

### भारतीय संस्कृती व ज्ञानपरंपरा जपण्याची गरज

यावेळी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, देशातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ असल्याचे सांगून भारतीय संस्कृती व ज्ञानपरंपरा जपण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

08 JAN 2026
पुढारी

# एमबीए, एमजे, एमकॉम परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील एमबीए, एमजे, एमकॉम, बी. आर्किटेक्चर अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारी सुरळीत झाल्या. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. परीक्षेला ६४५ विद्यार्थी उपस्थित होते. दि. ७ रोजी एमबीए, एमआरएस, एमसीए, ऑर्गेनिक केमेस्ट्री, फिजिकल केमेस्ट्री आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ४४० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

08 JAN 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कंटेंट अपरिहार्य

## अभिजित रेडेकर; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

डिजिटल युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ई-कंटेंट अपरिहार्य असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या संगणक विभागाचे संचालक अभिजित रेडेकर यांनी केले.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच पी.एम.-उषा अंतर्गत 'डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ ई-कंटेंट फॉर ऑनलाईन अँड मुक्स' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी बहुविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. अजय साळी होते.



रेडेकर म्हणाले, 'ई-कंटेंट विकासाचे कौशल्य प्रत्येक शिक्षक व विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान साक्षरता ही मूलभूत गरज बनली असून, स्वयं व महा-स्वयं या प्लॅटफॉर्मवर सक्रिय सहभाग घेणे महत्त्वाचे आहे.

डॉ. साळी म्हणाले, 'भविष्यात शिक्षण घेण्यासाठी केवळ वर्गखोलीची आवश्यकता उरणार नाही, अशी मानसिकता निर्माण होत आहे. बदलती पिढी डिजिटल शिक्षणाकडे वेगाने वळत असून, त्यासाठी प्रभावी, परिणामकारक आणि गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट तयार करणे आवश्यक आहे.'

प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख नाझिया मुल्लाणी यांनी, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी यांनी केले. संदीप थिटे यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, प्रा. डॉ. नितीन माळी, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ. राम चट्टे, प्रा. कांचन खराडे, डॉ. प्रमोद कोळी, डॉ. किशोर खिल्लारे आदी उपस्थित होते.

0 8 JAN 2026
पुढारी

# विद्यापीठात आज परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी (दि. ८) गणित विभाग येथे स. ११ वा. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे पैलू' विषयावर परिसंवादाचे आयोजन केले आहे. परिसंवादामध्ये माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, साहित्यिक सुशील धसकटे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे विविध पैलूंच्या अनुषंगाने मांडणी करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत.

0 8 JAN 2026

सकाळ

# बिद्रीत उद्या आंतरराष्ट्रीय परिषद

बिद्री, ता. ७ : येथील दूधसाखर महाविद्यालयात शुक्रवारी (ता.९) कार्यात्मक साहित्य तसेच ऊर्जा, पर्यावरण आणि जीवन विज्ञान क्षेत्रातील प्रगतीवरील आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. उद्घाटन आणि बीजभाषण आयसीटी मुंबईचे माजी कुलगुरू पद्मश्री प्रा. डॉ. जी. डी. यादव यांच्याहस्ते होणार आहे.

परिषदेत हिरोशिमा विद्यापीठ, जपानचे डॉ. विनायक पारळे, जर्मनीचे शास्त्रज्ञ डॉ. सत्यजित पाटील, नॅनोसायन्स विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे डॉ. हेमराज यादव मार्गदर्शन करतील. परिषदेसाठी विविध देशांतून आणि भारतातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी होतील. परिषदेत सादर होणारे शोधनिबंध व भित्तिपत्रके आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेमध्ये प्रकाशित होणार आहेत. उत्कृष्ट शोधनिबंध, भित्तीपत्रकांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात येईल. परिषद अध्यक्षस्थानी दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष के. पी. पाटील आहेत. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य पंडितराव केणे, सुनीलराज सूर्यवंशी, रणजित मुडूकशीवाले, सचिव सर्जेराव किल्लेदार प्रमुख उपस्थित राहणार आहेत. परिषदेसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 JAN 2026
सकाळ

# खासगी शिकवणी वर्गांवर अंकुश

## विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी समिती

पुणे, ता. ७ : राज्यातील शाळांमध्ये तसेच खासगी शिकवणी वर्गांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण तणाव निर्माण होऊ नये, म्हणून प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्याचे आदेश देत शालेय शिक्षण विभागाने कडक पावले उचलली आहेत. खासगी शिकवणी वर्ग चालकांनी विद्यार्थी आणि पालकांना यशस्वी होण्याची हमी देऊ नये, असे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. याबाबत खासगी शिकवणी वर्गांसाठी मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय निरीक्षण समितीत उच्च व तंत्रशिक्षण सहसंचालक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे सदस्य असणार असून जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने सामाजिक कार्यकर्ता, बाल-मानस तज्ज्ञ नामनिर्देशित सदस्य असणार आहेत. सुखदेब सहा यांनी सर्वोच्च न्यायालयात आंध्रप्रदेश सरकार विरोधात दाखल केलेल्या याचिकेप्रकरणी २५ जुलै २०२५ दिलेल्या आदेशानुसार न्यायालयाने देशातील शाळांमध्ये तसेच खासगी शिकवणी वर्गांतील विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्याच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

शालेय शिक्षण विभागाने बुधवारी अध्यादेशाद्वारे शाळा आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. १०० किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असणाऱ्या संस्थेत किमान एक पात्र समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ यांची नियुक्ती करावी. १०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या ठिकाणी बाह्य मानसिक आरोग्य व्यावसायिकांची मदत घ्यावी. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा अशा संस्थांमध्ये प्रवेशासाठी किंवा स्पर्धा परीक्षांमध्ये यशासाठी कोणतीही हमी देत नाही, याबाबत विद्यार्थी आणि पालकांना खासगी शिकवणी चालकांनी स्पष्टपणे अवगत करावे, अशी सूचना शालेय शिक्षण विभागाने केली आहे.

### तक्रार निवारण यंत्रणा उभारावी

खासगी शिकवणी वर्गांना महिन्यात तक्रार निवारण यंत्रणा तयार करावी. अधिकृत संकेतस्थळावर आणि व्यवसायाच्या ठिकाणी प्रदर्शित करावी. तक्रार नोंदविण्याची पद्धत, जबाबदार अधिकारी, निवारणाची कार्यपद्धती निश्चित करावी, अशा सूचना शालेय शिक्षण विभागाने केल्या आहेत.

### या आहेत मार्गदर्शक सूचना

- खासगी शिकवणी वर्गाचे वेळापत्रक विद्यार्थ्यांवर ताण येणार नाही, असे असावे
- खासगी शिकवणी वर्गात विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक यांच्यासाठी आठवड्यात किमान एक सुटी द्यावी
- सुटीच्या दुसऱ्या दिवशी कोणतीही मूल्यमापन चाचणी, परीक्षा घेऊ नये
- शिकवणी वर्ग एका दिवसात पाच तासांपेक्षा अधिक नसावे
- शिकवणी तास सकाळी फार लवकर किंवा सायंकाळी फार उशिरा ठेऊ नयेत
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, क्षमतावृद्धीसाठी उपक्रम राबवावेत
- प्रत्येक खासगी शिकवणी वर्गांने प्रभावी समुपदेशन व्यवस्था निर्माण करावी

08 JAN 2026
पुढारी



कोल्हापूर : शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवांतर्गत 'शाहिरी बाणा' कार्यक्रमाचे सादरीकरण करताना कलाकार.

# 'शिवस्पंदन' सांस्कृतिक महोत्सवांतर्गत 'शाहिरी बाणा' कार्यक्रमाचे सादरीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव (२०२५-२०२६) अंतर्गत बुधवारी मूकनाट्य, नकला, लघुनाटिका व 'शाहिरी बाणा' यांचे सादरीकरण राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले.

शाहीर पृथ्वीराज माळी व 'शाहिरी बाणा' या कार्यक्रमांतर्गत पारंपरिक वाद्यवादनासह पोवाडा, भारूड, शिवगीते यांचे बहारदार सादरीकरण केले. कार्यक्रमास विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. विनोद ठाकुर-देसाई, डॉ. प्रल्हाद माने, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, सुरेखा अडके आदी उपस्थित होते.

## आज बक्षीस वितरण

कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी, राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहामध्ये एकल नृत्य, समूह नृत्य आणि बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

08 JAN 2026

नवप्रवाल

# न्यूज शॉर्ट्स

## मतदानादिवशी सार्वजणिक सुट्टी

**कोल्हापूर :** कोल्हापूर महापालिकेची निवडणूक सुरु झाली असून १५ जानेवारी रोजी मतदान आहे. या मतदाना दिवशी राज्यशासनाने सार्वजाणिक सुट्टी जाहीर केली आहे. केंद्र शासनातील शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, सार्वजाणिक उपक्रम. बँकांचा यामध्ये समावेश असणार आहे. राज्यातील २९ महापालिकेची निवडणूक होत असून येथील मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील आदेशी काढले आहेत.

08 JAN 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वंचितांच्या जगण्याचा इतिहास समोर यावा : पांडेय



प्रा. पांडेय

कोल्हापूर, ता. ७ : वंचित, उपेक्षितांच्या जगण्याचा आणि अनुभवाचा इतिहास लिहिणे अत्यंत कठीण असते; पण तोच खरा दुर्लक्षित इतिहास आहे. तो समोर आणण्याचे काम नव्या पिढीतील इतिहास अभ्यासक, संशोधकांना करावयाचे आहे, असे प्रतिपादन अटलांटा (अमेरिका) येथील एमोरी विद्यापीठाचे प्रख्यात इतिहासतज्ज्ञ प्रा. ज्ञानेंद्र पांडेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात इतिहास, इंग्रजी, मराठी, हिंदी आणि विदेशी भाषा अधिविभागांनी घेतलेल्या 'दुर्लक्षित इतिहास: लपलेल्या इतिहासाची पुनर्प्राप्ती' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, तर डॉ. माया पंडित प्रमुख उपस्थित होत्या.

प्रा. पांडेय म्हणाले, 'समाज, राजकारण, संस्कृती आणि विचारप्रवाह यामध्ये होणारे बदल हे क्रांतीचेच स्वरूप असून, आजच्या काळातील डिजिटल क्रांतीने इतिहास लेखन व संशोधनाच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. इतिहासामध्ये केवळ काही निवडक नेत्यांचाच नव्हे, तर सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग, स्त्रिया यांच्यासह विविध सामाजिक घटकांचाही सक्रिय सहभाग असतो. इतिहास लेखनात या घटकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिल्याने इतिहासाचा समग्र आशय समोर येत



नाही. भविष्यातील इतिहास मात्र केवळ मोठ्या लढायांचा किंवा नेत्यांचा नसावा. तो इतिहास अशा सर्वसामान्य, वंचित, उपेक्षित योगदानकर्त्यांचा असावा आणि तो त्याच्या नजरेतून, अनुभवातून लिहिला जावा' डॉ. गोपाळ गुरू, रणधीर शिंदे, अक्षय सरवदे, तृप्ती करेकट्टी, शरद नावरे, शरद भुथाडिया आदी उपस्थित होते. डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले.

08 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात देखण्या शोभायात्रेने 'शिवस्पंदन' सुरू

## छत्रपती शिवरायांसह शाहू महाराज, फुले दांपत्य, राज कपूर अवतीर्ण; विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवाला आज सकाळी अत्यंत देखण्या व दिमाखदार शोभायात्रेने मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात प्रारंभ झाला. महोत्सवात विद्यापीठाच्या विविध अधिविभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला आहे.



या शोभायात्रेच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, यांच्यासह राज कपूर, नर्गीस, दादा कोंडके, उषा चव्हाण, व्ही. शांताराम, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर आदी कलाकारांच्या व्यक्तीरेखाही विद्यापीठाच्या प्रांगणात अवतरल्या. त्याखेरीज सहभागी अधिविभागांच्या संघांनी अतिशय कल्पकतेने प्रबोधनपर विषयांचे सादरीकरण शोभायात्रेद्वारे केले. शेतकरी, महाराष्ट्राची लोकसंस्कृती, सण व परंपरा, भारताच्या विविध प्रांतांमधील नागरिकांच्या वेशभूषा, आजची मल्टिटास्किंग महिला इत्यादींचेही दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ वेशभूषेवरच समाधान मानता शेतकरी आत्महत्या, पर्यावरणाचे संरक्षण, शिक्षण, मतदार जागृती व लोकशाही, वास्तव आणि आभासी जगातील फरक इत्यादींविषयीही सादरीकरण करून लक्ष वेधून घेतले. विद्यापीठात शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांनीही शोभायात्रेत आवर्जून सहभाग घेतला.

आज सकाळी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून शोभायात्रेस प्रारंभ करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. मीना पोतदार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार आणि डॉ. प्रमोद कसबे यांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले. मुख्य इमारतीपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास प्रदक्षिणा घालून हलगी व ढोलताशाच्या गजरात शोभायात्रा काढण्यात आली. मुख्य इमारतीसमोर सहभागी संघांनी आपापल्या विषयाच्या अनुषंगाने अत्यंत देखणे सादरीकरण केले.

### शिक्षणापलिकडे विचारांची सौहार्दपूर्ण देवाणघेवाण अपेक्षित : प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव

शोभायात्रेनंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शिवस्पंदन महोत्सवाचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षण घेणे आवश्यकच आहे. तथापि, त्यापलिकडे जाऊन सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून एकमेकांशी विचारांची सौहार्दपूर्ण देवाणघेवाण करावी, हाच हेतू शिवस्पंदनच्या आयोजनामागे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातून सादरकर्त्यांबरोबरच प्रेक्षकांनाही प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. आपल्या सादरीकरणातून प्रबोधनपर संदेश देणारे विद्यार्थी एक प्रकारे शिक्षकाचेच काम करतात, असे कौतुकोद्गार त्यांनी काढले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शोभायात्रेत केलेले सादरीकरण हे त्यांचे समाजभान जागृत असल्याचे निदर्शक आहे. निरोगी मन आणि शरीर यासाठी कला ही महत्त्वाची ठरते. समोरच्या सादरकर्त्याला दाद देणे ही सुद्धा एक कला आहे. ती सुद्धा मनापासून जोपासली पाहिजे.

यावेळी डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रमोद कसबे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मदनलाल शर्मा, संग्राम भालकर, सुरेखा अडके आदींसह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सर्वच स्पर्धांना उत्तम प्रतिसाद

उद्घाटन समारंभानंतर राजर्षी शाहू सभागृहात दिवसभर सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन, समूहगीत स्पर्धा आणि लोकवाद्य वादन ताल उत्सव झाला. त्याचप्रमाणे रांगोळी आणि स्थळचित्रण स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात पार पडल्या. या सर्वच स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

### महोत्सवात उद्या...

उद्या, बुधवारी (दि. २४) राजर्षी शाहू सभागृह येथे मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा होतील. रसिकांनी त्यांचा आवर्जून आस्वाद घ्यावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

0 8 JAN 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षेतील ४१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील १२ अभ्यासक्रमांचे निकाल नुकतेच जाहिर झाले असून आजअखेर ४१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. सोमवारी विविध ९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने २५ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ११७५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.